आर.सी.एस. क्रमांक ०२-२०१९
जब्बार वि. सुजित
CNR No. MHOS140000692019

## निशाणी क्र. 47 वरील आदेश

वादीने प्रस्तुचा दावा मनाई हुकूम व घोषणेकरिता दाखल केला आहे. वादीचे मुख्य कथन असे की, त्याच्या जमिनीच्या शेजारी प्रतिवादी यांची जमीन आहे व त्या दोघांमध्ये हद्दीच्या खुणावरून वाद होत असतो म्हणून वादीने हा दावा वरील कारणाकरिता दाखल केला आहे.

वादीचा पुरावा चालू असताना ही बाब जेंव्हा न्यायालयाला लक्षात आली तेंव्हा न्यायालयाने दोन्ही विधीज्ञाना याबाबत विचारणा केली की, जर वादीचा वाद मोजणी केल्यानंतर मिटत असेल तर मोजणी करून तो वाद मिटवून घ्यावा त्यावर दोन्ही विधीज्ञानी होकार दिला. त्यावरून वादीच्या विधीज्ञाने निशाणी क्र. 47 वर मोजणीचा अर्ज दिला. त्या अर्जावर प्रतिवादीच्या विधीज्ञाने हरकत नाही असा जवाब दिला.

एकंदरीत या प्रकरणाचे तथ्य पाहिले असता असे दिसून येते की, वादी हे गट क्रमांक ७ चे मालक आहेत व त्या गटाच्या शेजारी प्रतिवादी क्रमांक २ ते ५ यांचा गट नंबर ८ आहे. गट क्रमांक ७ व ८ मधील जी हद्द आहे त्या हद्दीवरून वादी प्रतिवादी मध्ये वाद आहे आणि तो वाद मोजणी केल्याने मिटू शकतो असे वादी प्रतिवादीच्या विधीज्ञांचे म्हणणे आहे.

जर प्रकरणातील वाद मोजणीने मिटत असेल तर मोजणी करण्यास हरकत नाही. सबब खालील प्रमाणे आदेश.

## आदेश

1. वादीने निशाणी क्र. 47 खाली दाखल केलेला मोजणीचा अर्ज मंजूर करण्यात येतो.
2. तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, परांडा यांना आदेशित करण्यात येते की, त्यांनी वादीच्या गट नंबर ७ ची मोजणी करून हद्यीच्या खुणा निश्चित कराव्यात.

3. मोजणीपूर्वी गट नंबर ७ च्या चतु:सिमेलगत सर्व हिस्सेदार यांना आगाऊ नोटीस देऊन त्यांना मोजणीच्या वेळेस हजर राहण्यास विनंती करण्यात यावी.

4. मोजणीचा खर्च वादीने सोसावा व तो खर्च वादीने परस्पर मोजणी कार्यालयात भरावा.

5. तसेच वादीला असेही सुचित करण्यात येते की, मोजणीस आवश्यक असणारे सर्व कागदपत्र जे तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, परंडा मागतील ते त्यांना पुरविण्यात यावेत.

6. वादीने मोजणीची फीस तसेच आवश्यक कागदपत्रे आज पासून पंधरा दिवसाचे आत मोजणी कार्यालयात जमा करावी व त्याचा पुर्तता अहवाल या न्यायालयास सादर करावा अन्यथा वादीचा अर्ज दप्तरी दाखल समजून प्रकरण पुढे चालवण्यात येईल.

RAJU TUKARAM INGLE

Digitally signed by RAJU TUKARAM INGLE
Date: 2023.09.04 11:32:31 +0530

दिनांकः-०२.०९.२०२३

(आर. टी. इंगळे)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
परंडा

CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F file Judgment/Order/Record and Document are same, word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | - | Vaibhav Mohanrao Ingale<br>Stenographer (Grade-III) |
| Court | - | Civil Court Senior Division, Paranda. |
| Date | - | 02-09-2023 |
| Order signed by the presiding officer on | - | 02-09-2023 |
| Order uploaded on | - | 02-09-2023 |